# General Diary Details
## ठाणे दैनंदिनी तपशील

**Date** 30/01/2019 06:06

**State (राज्य):** महाराष्ट्र

**P.S. (पोलीस** ठाणे नगर

**District** ठाणे शहर

1. **G.D. No. (ठाणे दैनंदिनी** 012
2. **G.D. Date (ठाणे दैनंदिनी** 30/01/2019 06:06 बजे
3. **G.D. Type (ठाणे दैनंदिनी** फौजदारी प्रकरण
4. **Entry for (officer) (प्रविष्टि(अधिकार्यासाठी** RAVIKANTDIGAMBARMALEKAR
5. **Case Type (प्रकरणाचा**
6. **G.D. Brief (ठाणे दैनंदिनी संक्षिप्त):**

नमुद वेळी पोउपनिरी/कुलकर्णी निवेदन करतात की , जा क्र/ असीबी/ ठाणे/डीडीबी/ 71/2019 पोलीस निरीक्षक अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे दि.30/01/2019 अन्वये पोलीस निरीक्षक दिपक बर्गे, नेम-अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे यांनी रिपोर्टसोबत फिर्याद दिली की,

फिर्यादी- दिपक दिनकर बर्गे, वय 40 वर्षे, पोलीस निरीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे सरकारतर्फे फिर्याद लिहुन देतो की,

मी, फेब्रुवारी 2018 पासुन अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे कार्यालय येथे पोलीस निरीक्षक या पदावर कार्यरत आहे. दि. 29/01/2019 रोजी मी अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे कार्यालयात असताना तक्रारदार श्री. विश्वनाथ रामचंद्र करलाद यांनी मा. पोलीस अधिक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे यांच्या नावाने लेखी तक्रार दिली. तिचा आशय खालीलप्रमाणे,

तरी लोकसेवक वासुदेव श्रीराम पवार, वय 48 वर्षे, पद.- शिधावाटप निरीक्षक, शिधावाटप कार्यालय क्रमांक 41 फ, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, ठाणे (पश्चिम) यांनी लोकसेवक या नात्याने मिळालेल्या अधिकाराचा व पदाचा दुरूपयोग करून तक्रारदार श्री. करलाद यांचेकडे दिनांक 29/01/2019 रोजी रु. 16,500/-रक्कमेची लाचेची मागणी करून 12000/- रुपये लगेच घेवून येण्यास सांगून, उर्वरीत 4500/- रुपये लाचेची रक्कम दोन ते तीन दिवसांनी देण्यास सांगितले. तसेच सापळा कारवाई दरम्यान दिनांक 29/01/2019 रोजी 18.53 वा. च्या सुमारास शिधावाटप कार्यालय क्रमांक 41 फ, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, ठाणे या कार्यालयातील लोकसेवक वासुदेव श्रीराम पवार हे बसत असलेल्या टेबलासमोरील श्रीमती जे.एम. शिंदे, शिधावाटप निरीक्षक यांच्या टेबलावर असलेल्या लोकसेवक पवार यांच्या वापरातील काळ्या रंगाच्या बॅगेत टाकण्यास सांगून लाचेच्या रक्कमेचा स्विकार केलेला आहे. म्हणून लोकसेवक श्री. वासुदेव श्रीराम पवार, वय 48 वर्षे, पद.- शिधावाटप निरीक्षक, शिधावाटप कार्यालय क्रमांक 41 फ, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, ठाणे (पश्चिम) यांचे विरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा 1988 (संशोधन 2018) चे कलम 7 प्रमाणे सरकारतर्फे फिर्याद आहे.

अशी फिर्याद दिल्याने गुन्हा दाखल करून सदर गुन्ह्याची माहिती ईमेल द्वारे ठाणे नियत्रंण कक्ष येथे पाठविण्याची तजवीज ठेवली आहे. तसेच खबरी रिपोर्टची एक प्रत ताबडतोब फिर्यादिस विनामुल्य अदा केली आहे. तसेच एक प्रत मा. न्यायालयात पाठविण्याची तजवीज ठेवली आहे. तसेच सदर गुन्ह्याची माहीती मा. वरिष्ठांना देण्यात आली असुन सदर गुन्ह्याचा पुढील तपास पोनि/दिपक बर्गे, नेम-ए.सी.बी ठाणे हे करीत आहे म्हणुन नोंद.

7. **Subject (विषय):**

गु.रजि.नं 25/2019

8. **Acts & Sections (अधिनियम आणि कलम):**

| S.No.(अ. | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|

**Report Printed on (अहवाल मुद्रित केलेली** 30/01/2019

**Report Printed by (द्वारे अहवाल मुद्रित केला):**

**Name** RAVIKANT DIGAMBAR

**Rank (पद):** I (Inspector)

**Signature**

**Name** RAVIKANT DIGAMBAR MALEKAR

**Rank (पद):** I (Inspector)

**No.(क्र.):** 1234

Scanned by CamScanner

# General Diary Details
## ठाणे दैनंदिनी तपशील

**Date** 30/01/2019 06:14

**State (राज्य):** महाराष्ट्र

**P.S. (पोलीस** ठाणे नगर

**District** ठाणे शहर

1. **G.D. No. (ठाणे दैनंदिनी** 013
2. **G.D. Date (ठाणे दैनंदिनी** 30/01/2019 06:14 बजे
3. **G.D. Type (ठाणे दैनंदिनी** अटक/शरण
4. **Entry for (officer) (प्रविष्टि(अधिकार्यासाठी** RAVIKANTDIGAMBARMALEKAR
5. **Case Type (प्रकरणाचा**
6. **G.D. Brief (ठाणे दैनंदिनी संक्षिप्त):**
   नमुद वेळी ठाणेनगर पो स्टे गु.रजि.नं 25/2019 भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा 1988 (संशोधन 2018) चे कलम 7 मधील आरोपी नामे लोकसेवक श्री. वासुदेव श्रीराम पवार, वय 48 वर्षे, पद.- शिधावाटप निरीक्षक, शिधावाटप कार्यालय क्रमांक 41 फ, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, ठाणे (पश्चिम) यांना अटक केली असुन त्याचे अटकेची माहीती मुलगा जयदिप पवार, वय- 20 वर्षे यास देण्यात आली असुन .अटक करताना सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्वांचे पालन करण्यात आले असुन आरोपीतांना त्याचे न्यायहक्काची जाणीव करुन दिली आहे. आरोपीताची वैद्यकीय तपासणी केली आहे. तरी आरोपीत यास विहीत वेळेत मा न्यायालयात हजर करण्याची तजवीज ठेवली आहे म्हणुन नोंद
7. **Subject (विषय):**
   गु.रजि.नं 25/2019 आरोपी अटक केले बाबत
8. **Acts & Sections (अधिनियम आणि कलम):**

| S.No.(अ. | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|

**Report Printed on (अहवाल मुद्रित केलेली** 30/01/2019

**Report Printed by (द्वारे अहवाल मुद्रित केला):**

**Name** RAVIKANT DIGAMBAR

**Rank (पद):** I (Inspector)

**Signature**

**Name** RAVIKANT DIGAMBAR MALEKAR

**Rank (पद):** I (Inspector)

**No.(क्र.):** 1234



Scanned by CamScanner